# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
इ-मेल: directorcrs78@gmail.com


जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/ 486 /२०२६ दि. 10 /07 /२०२६

## निविदा सूचना

**विषय:- मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत सन २०२६-२७ खरीप बिजोत्पादन कार्यक्रम अंतर्गत विविध पिकांची राखणी कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता निविदा दर (कोटेशन) बोलविणेबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत सन २०२६-२७ खरीप बिजोत्पादन कार्यक्रम अंतर्गत विविध पिकांची राखणी कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

1. निविदा पत्रक/कोटेशन सादर करताना पाकिटावर सन २०२६-२७ खरीप बिजोत्पादन कार्यक्रम अंतर्गत विविध पिकांची राखणीचे कामे करणेसाठी निविदा दर सादर करण्याबाबत असा स्पष्ट उल्लेख करावा व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील
2. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी.
3. निविदाधारक/कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
4. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील राखणदारी संबंधित कामे करीत असतांना पिकाचे/फळबागेचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.
5. प्रक्षेत्रावरील विभागांवर राखणदारी संबंधित कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.
6. विभागावर देण्यात आलेले राखणदारी संबंधित काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
7. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारक/कंत्राटदारांना बंधनकारक राहील.
8. निविदाधारक/कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

9 या कार्यालयातर्फे निविदाधारक/कंत्राटदारास राखणदारी संबंधित काम करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य/मनुष्यबळ पुरविण्यात येणार नाही. राखणदारी संबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य/मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

10 निविदाधारक/कंत्राटदारास राखणदारी संबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतर व कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

11 प्रक्षेत्रावरील विभागांवर राखणदारी संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

12 प्रक्षेत्रावरील विभागांवर राखणदारी संबंधित कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

13 बिजोत्पादन पिकांची राखणदारीचे काम करण्यासाठी पुरविण्यात आलेले स्त्री/पुरुष हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षपेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दुष्ट्या सक्षम असावेत.

14 प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन पिकाची राखणदारी संबंधित कामाचे दर हे ज्या दिवसी ई-निविदा दर लागू होतील त्या दिनांकाच्या आधील दिवसापर्यंत वैध राहतील.

15 वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. **१६.०७.२०२६** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# <u>निविदा (कोटेशन) मसुदा</u>

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत सन २०२६-२७ खरीप बिजोत्पादन कार्यक्रम अंतर्गत विविध पिकांची राखणी कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचे विवरण | कामाचा प्रकार | दर रु. प्रति. १०हेक्टर २४ तासा करिता (तिन पाळी, ८ तास प्रति पाळी) |
|---|---|---|---|
| १ | पिकांची राखणदारी करणेबाबत | विभागावरील बिजोत्पादन क्षेत्राची राखणदारी करणे (सर्व साहित्यासह जसे गम बूट, शिट्टी, लाठी, खुट्टया, तार, झटका मशीन इत्यादी) | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण